TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्र. २८१९ २८ २८/ २८१९ ३० २८ फॅक्स क्र. २८१९७६३६
ई मेल : १. rchmbmc@rediffmail.com, 2) rchmbmc@yahoo.com

बेटी बचाओ
save the girl child

## वैद्यकीय आरोग्य विभाग

जा.क्र मनपा/वैद्यकीय/७६३/२०२०-२१. दि. १५/०६/२०२०.

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय : जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत.**

कोरोना विषाणु (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागात ठोक मानधनतत्वावर करार पध्दतीने पदभरतीकरीता जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर जाहिरात महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहिरात जोडण्यात आली आहे.

(संभाजी वाघमारे)
उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे :- 401 101

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/ ७६३ /२०२०-२१ दि. १५ /०६/ २०२०

// जाहिरात //

**विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर करार पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी खालील नमुद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन दि. २०/०६/२०२० रोजी संध्या ५.०० वाजेपर्यंत मुख्यकार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका येथे अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी विहित केलेल्या अर्जाच्या नमुन्यात अर्ज सादर करावा. नमुद पदसंख्येची प्रारुप गुणवत्ता (Draft) यादी तयार करुन पदे आवश्यकतेनुसार खालील नमुद अटींशर्तीच्या अधिन राहून प्रारुप यादीमधुन ठोक मानधन तत्वावर करार पध्दतीने भरण्यांत येणार आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | भिषक (Physician) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी. वैद्यक शास्त्र विषयातील पदवी. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी आवश्यक. | रु.२,००,०००/- | ६ |
| २ | भिषक (Physician) (On Call) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी. वैद्यक शास्त्र विषयातील पदवी. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी आवश्यक. | रु.२,०००/- | १४ |
| २ | भूलतज्ज्ञ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी. भुलतज्ज्ञ विषयातील पदवी. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडे नोंदणी आवश्यक. | रु.२,००,०००/- | ६ |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | MBBS अर्हताधारक रु. ८०,०००/-, | ८७ |
| ४ | वैद्यकीय अधिकारी (आयुष) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस व तत्सम अर्हता पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | आयुष अर्हताधारक रु. ५५,०००/- | ८९ |
| ५ | रुग्णालय व्यवस्थापक | वैद्यकीय पदवीधर , १ वर्षाचा रुग्णालय व्यवस्थापनाचा अनुभव आवश्यक | रु. ६५,०००/- | ९ |
| ६ | परिचारिका | G.N.M कोर्स उत्तीर्ण / B.Sc. नर्सिंग उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. ४०,०००/- | ४९२ |
| ७ | प्रसविका | एस.एस.सी/ एच.एस.सी आणि मान्यता प्राप्त संस्थेतील ऑक्झिलरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पूर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोंदणी आवश्यक | रु. २५,०००/- | ४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | क्ष-किरण तंत्रज्ञ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची भौतीक शास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी. शासन मान्यता प्राप्त संस्थेतून क्ष-किरण तंत्रज्ञ या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण. | रु. ३०,०००/- | ८ |
| ९ | ई सी जी तंत्रज्ञ | मान्यता प्राप्त विद्यापीठाची भौतीक शास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी. शासन मान्यता प्राप्त संस्थेतून ई सी जी तंत्रज्ञ या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण. | रु. ३०,०००/- | ८ |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | बी. एस्सी आणि डि.एम.एल.टी (B.Sc with D.M.L.T), (प्रथम प्राधान्य) एच.एस.सी आणि डि.एम.एल.टी (H.S.C. With D.M.L.T) (द्वितीय प्राधान्य) | रु. ३०,०००/- | २८ |
| ११ | औषध निर्माता | डी. फार्म (D Pharma)/ बी. फार्म (B. Pharma.), Registered with Pharmacy Council, | रु. २५,०००/- | ३२ |

**अटी व शर्ती :-**

१) सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता (Draft List) यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महानगरपालिकेला गरज भासेल त्या प्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधुन कंत्राटी पध्दतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करण्यांत येतील.

२) उपरोक्त पदांकरीता कालावधी प्रथमत: ३ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत.

३) क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम असावा.

**इतर अटी व शर्ती :-**

१. सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमून्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमूना) अर्ज करणे बंधनकारक राहील.

२. वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत.

३. अर्जासोबत १. वयाचा पुरावा, २. पदवी / पदवीका प्रमाणपत्र ३. शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका

४. अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र

५. संबंधित पदासाठी तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

६. कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी कोविड केअर सेंटर (CCC), समर्पित कोविड आरोग्य केंद्र (DCHC), समर्पित कोविड रुग्णालय (DCH) या ठिकाणी सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची प्राधान्य क्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

७. मधुमेह / उच्च रक्तदाब / हृदय विकार इ. नसणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी बॉंड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांना सदर पदभरतीकरिता प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी अर्जात आपले संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई मेल आयडी, जन्म दिनांक, शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, वरील नमूद आजार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच बॉंड संपलेले डॉक्टर व नर्सेस यांनी अर्जात यापूर्वी केलेल्या सेवेचा संपूर्ण तपशिल नमूद करावा.

८. उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी प्रथमत: ३ महिन्याकरीता नेमणुक देण्यात येणार असून त्यांची नेमणूक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच (३ ते ६ महिने) राहणार असून सदर साथ कमी

झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

९. खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकूण १०० गुणांची गुणतालिका तयार करण्यांत येणार आहे.

| पदाचे नांव ...................................................... | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | शैक्षणिक अर्हता (अंतिम वर्षाचे गुण) (८० गुण) | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता (Add Qualification) (१० गुण) | अनुभव (१० गुण) | एकुण गुण (१०० गुण) |
| | | | | | |

- वैद्यकिय अधिकारी (MBBS) शैक्षणिक अर्हता असणाऱ्या तसेच पदव्युत्तर पदविका धारण केलेल्या उमेदवारास ५ गुण व पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारास १० पैकी गुण देण्यांत येतील.
- परिचारीका (GNM) शैक्षणिक पात्रता असणाऱ्या तसेच बी.एससी. नर्सिंग शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास ५ पैकी व एम.एससी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारास १० पैकी गुण देण्यांत येतील.
- औषध निर्माता (D.Pharma) अर्हता असलेल्या त्याचप्रमाणे (B.Pharma) अतिरीक्त शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारास ५ पैकी गुण व (M. Pharma) शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारास १० पैकी गुण याप्रमाणे अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेचे गुण वितरीत करण्यांत येतील. तसेच B.Pharma अर्हता असलेल्या परंतु कोणत्याही अतिरीक्त शैक्षणिक अर्हता नसलेल्या उमेदवारांचे अनु.क्र.९ मधील तक्त्यातील शैक्षणिक अर्हततेचे गुण हे ९० % गुणांनुसार धरण्यांत येतील .

१०. पदासमोर नमूद मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

११. अनुभवाच्या गुणाकरीता शासकीय / निमशासकीय कार्यालयात काम केल्याचे अनुभव ग्राहय धरण्यात येईल. प्रत्येक वर्षाकरीता १ गुण याप्रमाणे अनुभवाचे एकुण १० गुण राहतील. पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेचे (Add Qualification) १० गुण देण्यांत येतील.

१२. गुणवत्ता यादी तयार झाल्यानंतर ती https://mbmc.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल.

१३. छाननी नंतर योग्य उमेदवारांनी निवड करण्याचे अंतिम निर्णय मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

१४. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दूरध्वनीवर करण्यात येऊ नये.

१५. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१६. सदर रिक्त पदांची संख्या कमी-जास्त होऊ शकते याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर संख्यांमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१७. पुनर्नियुक्तीबाबत शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१८. करार पध्दतीने निवड करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांनी विहित नमुन्यातील वचनपत्र भरुन देणे आवश्यक आहे.

१९. सदर उमेदवारांना महापालिका सेवेत हक्क सांगता येणार नाही.

२०. उपरोक्त पदांकरीता सुरवातीचा नेमूणक कालावधी ३ महिने असेल. सदर कालावधीत कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव कमी झाल्यास तथा रुग्णालयातील कोविड उपचार काम बंद झाल्यास गरजेनुसार सदर नेमणूक कोणतीही आगाऊ सुचना न देता रद्द करण्यांत येतील

२१. रुग्णालयात कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

२२. भरती प्रक्रियेदरम्यान सर्व अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

15/06/2020

**(संभाजी वाघमारे)**
उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ..........................................................पदांचा सांकेतिक क्र. .................. )

प्रति,
**मा. उप-आयुक्त (वैद्यकीय)**
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

फोटो

(१) संपुर्ण नांव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

१. **आडनांव** : .......................................... ..........................................

२. **स्वत:चे नांव** : .......................................... ..........................................

३. **वडिलांचे/ पतीचे नांव** : .......................................... ..........................................

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता** : ..........................................................................................
**(पिन कोडसहित)** ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ..........................................................................................

(३) **अ) जन्मतारीख** : **तारीख** **महिना** **वर्ष**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब)** मुलाखतीच्या **दिनांक**
**रोजीचे वय** ............................**वर्ष**............................**महिने**.............**दिवस**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(५) **शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) शाळा सोडल्याचा दाखला २) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र ३) नोंदणी प्रमाणपत्र

**ठिकाण** :-

**दिनांक** :-

**अर्जदाराची सही/-**